**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २३० / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.गजेंद्र अ. वारके,
'व्दारकामाई' व्दारकानगर,
कांडली, पो.परतवाडा, जि.अमरावती.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय,
अमरावती जि.अमरावती.

२. जन माहिती अधिकारी तथा
उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय,
अमरावती जि.अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक २५/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्री.आर.टी. गिते हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती श्री.आर.एन. वर्मा हे हजर आहेत.

अर्जदाराने खरपी व वज्जर चेकपाईंट येथील शासकीय अभिलेखांची तपासणी व निरीक्षणासाठी अर्ज केला होता व सदर पाहणी व निरीक्षणानंतर अर्जदाराचे समाधान झाले आहे व कोणतीही तक्रार राहिली नाही म्हणुन अर्जदाराचा अर्ज नस्तीबध्द करण्यात यावा, अशी विनंती दिनांक २०/०२/२०१० रोजी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी तथा जन माहिती अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती यांचे कडे केला व त्याची प्रत हया आयोगासमोर दाखल केली.

अर्जदाराची विनंती मान्य करण्यात येवुन अर्जदाराचे अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.२३१ / २०१०**

**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**

सिंधु प्रभाकरराव यमतकर,

"वात्सल्य - सिंधु", ५ बालाजी नगर,

गोरक्षण रोड, अकोला, जि.अकोला.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा

गटविकास अधिकारी, (वर्ग -१),

पंचायत समिती, अकोला, जि.अकोला.

२. जन माहिती अधिकारी तथा

गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,

अकोला, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक २५/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे अधिक्षक, पंचायत समिती, अकोला सौ.विद्या गिरी हया हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, अकोला श्री.अंबादास मानकर हे हजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदाराने व्दितीय अपिल हया आयोगासमोर दिनांक १५/०२/२०१० रोजी दाखल केले व दुसरे अपिल दाखल करण्याचे कारण माहिती अपुर्ण मिळाली असे आहे. परंतु माहिती अपुर्ण कशी आहे याबाबत स्पष्टीकरण कुठेच दिसुन येत नाही.

अर्जदाराला मुळ अर्ज पाहिला असता अर्जदाराने त्यांचे वेतन, भत्ते तसेच रोखुन ठेवलेल्या रकमेबाबतची माहिती मागितली होती. अर्जदाराला माहिती ही दिनांक ०८/१२/२००९ व दिनांक २९/१२/२००९ रोजी अशी दोन वेळेला माहिती पुरविण्यात आली. परंतु अर्जदाराला दयावयाची रक्क्म न मिळाल्यामुळे अर्जदाराने व्दितीय अपिल दाखल केले असा निष्कर्ष काढण्यात येते. माहिती पुर्ण दिलेली आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या खुलाश्यावरुन दिसुन येते. तसेच मुद्दा क्र.३ नुसार वेतन भत्ते, वेतन वाढ, तसेच रोखुन ठेवलेली रक्कम बाबतचे देयके निरीक्षण करुन देण्यात आले. त्यामुळे अर्जदार गैरहजर राहिले असावे असा निष्कर्ष काढण्यात येते. अर्जदाराला माहिती पुरविण्यात आली आहे.

वरील बाबी लक्षात घेता सदरचे अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २३२/ २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. नारायणराव काशिराम महल्ले,
रा.दत्त मंदिराजवळ, गणेश नगर,
जुने शहर, डाबकी रोड, अकोला.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,३, महापालिका मार्ग,
पत्रपेटी क्र.१९६७, मुंबई -०१.
२. जन माहिती अधिकारी,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,३, महापालिका मार्ग,
पत्रपेटी क्र.१९६७, मुंबई -०१.

**(आदेश पारीत दिनांक २५/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. नारायणराव काशिराम महल्ले हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी तर्फे सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती डॉ.श्री.प्र.म. खोडके हे हजर आहेत.

अर्जदाराने प्रपत्र 'अ' नुसार श्री. सुनील श्रीरामजी हातेकर व श्री.अनिल अनंत घारुळकर यांनी दिनांक १०/१०/२००९ ला पंजीबध्द डाकेने उच्च न्यायालयाच्या आदेशासह कामावर रुजु करण्याबाबत व मागील सर्व (बॅक वेजेस) पगार मिळण्याबाबत दाखल केलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा तपशिलाची माहिती मागितली. उत्तरवादी यांचे म्हणण्यानुसार सदर प्रकरणात याचिकेचा क्रमांक व तपशिल नसल्यामुळे माहिती पुरविण्यात आली नाही. आज रोजी या आयोगासमोर केस नंबर व आदेश दाखविण्यात आला. त्यावर त्यांनी अर्जदाराला १५ दिवसात माहिती देण्याचे कबुल केले. सदर माहिती व्यक्तीशः किंवा पोष्टाव्दारे अर्जदाराला उपलब्ध करुन दयावी .

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.२३९ / २०१०**

**जा.क्र. दि.**

अर्जदार तथा अपिलकर्ता
शेख रहेमु शेख महेमुद,
नुरनगर क्र.(२), अमरावती,
जि.अमरावती.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती.

२. जन माहिती अधिकारी तथा
अन्नधान्य वितरण अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक २५/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, अमरावती तर्फे श्री.एम.एच. राठोड हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, अमरावती श्री.विरेंद्र दिक्षीत हे हजर आहेत.

अर्जदाराने दिनांक २४/११/२०१० रोजी हया आयोगाच्या नावांने पत्र देवुन अर्जदाराला दिनांक २२/११/२०१० रोजी अन्नधान्य वितरण, अमरावती यांनी अपिलार्थीला त्यांच्या मुळ अर्जातील पाहिजे असलेली मुद्दा क्रमांक १४, १५, १६ या संबंधीची सर्व माहिती उपलब्ध करुन दिली व सदरची माहिती विनामुल्य पुरविण्यात आली व अर्जदाराचे समाधान झाले आहे व अपिल चालवायचे नसल्यामुळे अपिल खारीज करण्यात यावे अशी विनंती अर्जात केलेली आहे.

सदरची विनंती मान्य करण्यात येवुन अर्जदाराचे अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २३८/ २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.शेषराव भिमराव चव्हाण,
मु.वापटा, पो.कुपटा, ता.मानोरा,
जि.वाशिम.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, मानोरा, ता.मानोरा,
जि.वाशिम

२. जन माहिती अधिकारी तथा
शाखा अभियंता (बांधकाम विभाग),
पंचायत समिती, मानोरा, ता.मानोरा,
जि.वाशिम

**(आदेश पारीत दिनांक २५/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.शेषराव भिमराव चव्हाण हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मानोरा, श्री.किशोर श्रीवास्तव हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, (बांधकाम विभाग), पंचायत समिती, मानोरा श्री.ए.एन. देशमुख हे हजर आहेत.

सदर प्रकरणात उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, वाशिम यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांना दिनांक १६/११/२००९ रोजी दिलेल्या पत्रात अर्जदाराचे माहिती अधिकार अंतर्गत आलेले अपिल संदर्भात पंचायत समिती स्तरावर प्रथम अपिलीय अधिकारी गटविकास अधिकारी असल्याने अधिनियमाचे कलम ६ (३) नुसार हस्तांतरित करण्यात आले व प्रथम अपिल अर्जावर माहिती अधिकार अधिनियमान्वये विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन माहिती उपलब्ध करुन देण्याविषयी तात्काळ कार्यवाही करावी असे म्हटले आहे. सदर प्रकरणात प्रथम अपिलात कुठलीच कार्यवाही झालेली नाही म्हणुन व्दितीय अपिल दाखल करावे लागले. सदर प्रकरण आज रोजी सुनावणीसाठी ठेवले असता असे निदर्शनास आले की, प्रथम अपिलात कुठलाच निर्णय किंवा माहिती प्राप्त करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८/०९/२००९ ला पत्र देवुन माहिती निरंक असल्याचे कळविले आहे. परंतु अर्जदाराच्या म्हणण्यानुसार अर्जदाराला कुठलीही माहिती मिळाली नाही. सदर प्रकरणात जर प्रथम अपिलात निकाल घेतला असता तर अर्जदाराला व्दितीय अपिल दाखल करुन हया आयोगासमोर राहण्याची वेळ आली नसती. तरी गटविकास अधिकारी यांनी अर्जदाराला रु.१०००/- (रु. एक हजार फक्त) नुकसान भरपाई ६ आठवडयाच्या आंत दयावी व सदर प्रकरण ४ आठवडयाच्या आंत निकाली काढावे व माहिती असल्यास ती अर्जदाराला देण्यात यावी. सदर प्रकरणात रु. १००० नुकसान भरपाई म्हणुन दयावयाची रक्कम सार्वजनिक प्राधिकरणाने सोसायची की, जे जबाबदार असतील त्यांचें कडुन वसुल करायची याबाबत त्यांचे स्तरावरुन निर्णय घ्यावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २३३ / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
ॲड. नितीन म. उजगांवकर,
कोठारी नगर, धामनगांव रेल्वे, जि.अमरावती.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
धामनगांव रेल्वे, जि.अमरावती.

२. जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका, इंग्लीश मिडीयम प्रायमरी स्कुल,
धामणगांव रेल्वे, जि.अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक २५/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी ॲड. नितीन म.उजगांवकर हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे अधिक्षक (शिक्षण), पंचायत समिती, धामनगांव रेल्वे, जि.अमरावती श्री.एस.व्हि. सातपुते हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, इंग्लीश मिडीयम प्रायमरी स्कुल, धामनगांव रेल्वे श्रीमती एस.एस. गोगटे हया व त्यांचे वतीने ॲड. राजेंद्र पांडे हे हजर आहेत.

दिनांक ०८/१२/२००९ रोजी अर्जदार यांनी मुख्याध्यापिका, इंग्लिश मिडियम प्रायमरी स्कुल, धामणगांव रेल्वे यांचेकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन दिनांक ०३/१२/०९ रोजी रजेवर असणा-या सर्व शिक्षक / शिक्षिकांची नांवे व त्यांनी दिलेल्या रजेच्या अर्जाच्या साक्षांकित प्रती तसे दिनांक ०३/१२/०९ रोजी दुपारच्या सत्रात सर्व वर्ग मिळुन किती विदयार्थी हजर होते, पटावर एकुण विद्यार्थी संख्या किती याबाबत व्यक्तीशः किंवा टपालाने माहिती मागितली. त्यानंतर दिनांक २२/१२/२००९ रोजी सदर शाळेच्या मुख्याध्यापिका यांनी अर्जदार यांना अर्जदाराला असे उत्तर पाठविले की, त्यांची शाळा कायम विनाअनुदानीत असुन शासनाव्दारे कोणतीही आर्थिक अनुदान मिळत नाही. सबब ही शाळा माहितीच्या अधिकाराच्या कक्षेत येत नाही. त्यानंतर अर्जदाराने प्रपत्र 'ब' नुसार दिनांक ०४/०१/२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी (प्राथ.), गटविकास अधिकारी, पंचायत समिती, धामनगांव रेल्वे यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले व सदर प्रकरणात अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प. यांनी दिनांक ०४/०२/२०१० रोजी जन माहिती अधिकारी व अर्जदार यांना पत्राव्दारे असे कळविले की, आपण दिनांक २२/१२/२००९ रोजी दिलेल्या पत्रान्वये म्हणजे मुख्याध्यापिका यांच्या पत्रान्वये त्यांनी त्यांची शाळा कायम विना अनुदानित असुन शासनाकडुन कोणतेही अनुदान मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार कक्षेत येत नसल्याचे कळविले. परंतु सदर शाळा शासनाकडुन मान्यता प्राप्त असल्याने माहितीचा अधिकार अंतर्गत येत असल्याने आपण ॲड. श्री.नितीन उसगांवकर, यांना दिनांक ०८/१२/२००९ रोजी मागितलेली उपलब्ध असेल ती माहिती तात्काळ ७ दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन दयावी, असे आदेश दिले. सदर प्रकरणात अर्जदाराने हया आयोगासमोर व्दितीय अपिल दाखल केले व प्रथम अपिलाचा आदेश झाल्यावर सुध्दा शाळेकडुन माहिती प्राप्त झाली नाही असे अपिल दाखल करण्याचे कारण नमुद आहे. सदर प्रकरणात अर्जदाराने दिनांक २५/११/२०१० रोजी खुलासा दाखल केला व त्यात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदाराने मागितलेली माहिती विनामुल्य दयावी असा आदेश दिल्यावर सुध्दा आजपर्यंत माहिती मिळाली नाही. तरी संबंधित मुख्याध्यापिका यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा भंग केला व अर्जदाराची दिशाभुल केली त्यामुळे त्यांचेवर नियमानुसार दंडात्मक कार्यवाही व्हावी असे म्हटले आहे.

उत्तरवादी मुख्याध्यापिका यांचे तर्फे ॲड.श्री. पांडे यांनी असा युक्तीवाद मांडला की, अर्जदाराला दिनांक २२/१२/२००९ रोजी रजिष्टर पोष्टाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले व सदरची शाळा विना अनुदानित असल्यामुळे माहितीचा अधिकारी अधिनियमाच्या कक्षेत येत नसल्याचे कळविले. व संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी माहितीच्या अधिकाराच्या तरतुदीचा योग्य तो विचार केला नाही व आदेश योग्य व न्यायीक नसल्यामुळे मुख्याध्यापिका यांनी शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडे दि.१५/०२/२०१० रोजी पुनर्विलोकन अर्ज सादर केला. परंतु त्यावर आजतागायत कुठलाही निर्णय दिला नाही.

वरील बाबीचा विचार करता अर्जदाराचे अपिल खारीज करण्यात यावे अशी विनंती मुख्याध्यापिका यांनी केली आहे. सदर प्रकरणात हया आयोगाने याआधी सुध्दा विनाअनुदानित तत्वावर चालविण्यात येणा-या शाळा किंवा त्यांच्या संस्था हया माहिती अधिकाराच्या कलम २ (h) नुसार सार्वजनिक प्राधिकरणाच्या कक्षेत येत नाही त्यामुळे त्यांना माहिती अधिकार लागु नाही अशा प्रकारचा निर्णय हया आयोगाने त्यांचे समोर आलेल्या विनाअनुदानीत शाळांच्याबाबत घेतलेला आहे तसेच हया संबंधी उच्च न्यायालय, मुंबई, खंडपिठ नागपुर यांचा याचिका क्रमांक ५१३२/२००८ व नगर युवक शिक्षण संस्था विरुध्द महाराष्ट्र स्टेट ऑफ इन्फरमेशन कमीशन, नागपुर यांनी दिलेल्या निर्णयानुसार सदरची संस्था ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (h) नुसार सार्वजनिक प्राधिकरणाच्या कक्षेत येत नाही. इंग्लिश मिडियम प्रायमरी स्कुल, धामणगांव रेल्वे यांना अधिनियमाच्या तरतुदी लागु होत नाही. अर्जदाराने ही बाब मान्य केली की, सदरची संस्था ही विना अनुदानीत आहे. परंतु अर्जदार माहिती अधिकराच्या तरतुदी लागु होत नाही ही बाब मान्य करण्यात तयार नाही. अर्जदाराने केंद्रीय माहिती आयोग यांनी एम.एस.बिंदु खन्ना यांचे प्रकरणात आयोगाने दिलेल्या १४/०७/२०१० च्या निर्णयाचा हवाला देवुन सदर संस्थेला माहिती अधिकार लागु होतो असे म्हटले आहे परंतु हया आयोगावर मुंबई खंडपिठ, नागपुर यांनी दिलेला निर्णय बंधनकारक असल्यामुळे व हया आयोगाने इतर प्रकरणात विना अनुदानीत तत्वावर चालणा-या शिक्षण संस्था किंवा शाळा यांना माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २ (h) नुसार सार्वजनिक प्राधिकरणाच्या कक्षेत येत नाही असा निवाडा दिल्यामुळे अर्जदाराचे अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**